३२८

# महाराष्ट्र शासन

सक्षम प्राधिकारी तथा सहसचिव
अल्पसंख्याक विकास विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

क्रमांक:- अशैसं-२०१६/प्र.क्र.१४२/का-५, दिनांक :- ३०/०५/२०१६

## अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

साधना एज्युकेशन सोसायटी, जुहू रोड, सांताक्रुज ( प.), मुंबई- ४०० ०५४. या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस **भाषिक ( गुजराती )** अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि. १३.०४.२०१६ रोजी अर्ज सादर केला होता. दि. ३०/०५/२०१६ रोजी माझ्या सक्षम संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरी करणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक: अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का-५, दिनांक २७.०५.२०१३ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या **भाषिक ( गुजराती )** अल्पसंख्याकामधील व्यक्तीकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचलित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही भारतीय संविधानाच्या कलम ३० अन्वये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला **भाषिक ( गुजराती )** अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचलित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला **भाषिक ( गुजराती )** अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक: अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का-५, दि.२७.०५.२०१३ अन्वये विहीत करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

३०/५/१६

(अैनुल अत्तार)
सक्षम प्राधिकारी तथा सह सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन